RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ११, अंक १२(८)] शुक्रवार, जुलै ४, २०२५/आषाढ १३, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ५१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानसभेत **दिनांक ४ जुलै, २०२५** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा **नियम ११६** अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. XXXIX OF 2025.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९.**

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

सन १९६५ चा महा. अधिनियम क्रमांक ४०.

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यामध्ये यापुढे दर्शविलेल्या प्रयोजनासाठी सुधारणा करणे आवश्यक आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :–

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२५ असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो ताबडतोब अंमलात येईल.

सन १९६५ चा महा. अधिनियम क्रमांक ४०याच्या कलम ४२ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याच्या कलम ४२ मध्ये,—

(१) पोट-कलम (२) नंतर पुढील पोट-कलम जादा समाविष्ट करण्यात येईल :—

"(३-अ) त्याचप्रमाणे जर एखाद्या सदस्याने नगररचना किंवा विकासविषयक नियमांचे उल्लंघन करून एखादे अनधिकृत बांधकाम केले आहे किंवा कोणतेही अतिक्रमण केले आहे अशी जर संबंधित जिल्हाधिकाऱ्यांची खात्री पटली तर जिल्हाधिकाऱ्यांना आदेश काढून अशा सदस्याचे सदस्यत्व संपुष्टात आणता येईल :

परंतु, या प्रकरणात संबंधित सदस्यास राज्य शासनाकडे किंवा उच्च न्यायालयाकडे अपील करण्याचा अधिकार राहील व अपिलाचा निर्णय लागेपर्यंत संबंधित सदस्यांचे सदस्यत्व अबाधित राहील. शासनाकडील अपिलाचा निर्णय ६० दिवसांचे आत देणे राज्य शासनावर बंधनकारक राहील."

(२) पोट-कलम (३) ऐवजी पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(४) पोट-कलम (१) (२) (३) किंवा (३-अ) च्या प्रयोजनासाठी नगरपालिकेकडे कोणत्याही सभासदास पदावरून दूर करण्याविषयी शिफारस करणारा कोणताही ठराव, राज्य सरकारने पदावरून काढून टाकण्यासंबंधीचा कोणताही आदेश आणि जिल्हाधिकाऱ्याने सभासदत्व संपुष्टात आणण्यासंबंधी कोणताही आदेश, तो ज्या सभासदांसंबंधी असेल त्या सभासदास, यथास्थिती, अशा शिफारस करण्यात येऊ नये किंवा आदेश देण्यात येऊ नये याविषयी कारण दाखविण्याची वाजवी संधी दिल्यावाचून करता कामा नये."

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

राज्यातील नगरपालिकांचे सदस्य हे बऱ्याच वेळा अन्य नागरिकाप्रमाणे बेकायदेशीर बांधकामे व अतिक्रमणे करतात असे दिसून येत आहे. प्रत्यक्ष नगरपालिकांचे सदस्यच अशी अवैध बांधकामे करीत आहेत हे पाहिल्यावर नगरपालिकांचे कर्मचारी अशा अवैध बांधकामाच्या विरोधात कारवाई करण्यास कचरतात. त्यामुळे असे अवैध बांधकाम एखाद्या पालिका सदस्याने केल्याचे आढळून आल्यास त्याचे सदस्यत्व संपुष्टात आणण्याचा आदेश देण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देणे आवश्यक झाले आहे. संबंधित प्रकरणांचा निकाल ६० दिवसांत लागावा यासाठी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यामध्ये सुधारणा करणे आवश्यक झाले आहे.

म्हणून, हे विधेयक सादर करण्यात येत आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक २६ मे, २०२५.

**सुधीर मुनगंटीवार,**
प्रभारी सदस्य.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक ४ जुलै, २०२५.

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१),
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.